UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

## Special Issue

Issue I, Vol I 10th February 2018

Editor in Chief
**Mr.Arun B. Godam**

www.rjournals.co.in

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| 13 | एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कथेचे बदलते स्वरूप आणि वास्तव | प्रा.डॉ. जगताप उज्वला | 138 |
| 14 | जागतिकीकरण आणि भाषा, साहित्य व संस्कृती | डॉ.लक्ष्मण गिते | 141 |
| 15 | "जागतिकीकरण आणि मराठी कथात्म साहित्य" | श्री. सुनिल रामराव काकडे,<br>प्रा. डॉ. अनिरुध्द मोरे | 143 |
| 16 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | प्रा. डॉ. किरण प्रभाकर वाघमारे | 147 |
| 17 | जागतिकीकरण आणि भारतीय भाषा | डॉ. राम रौनेकर | 153 |
| 18 | जागतिकीकरणामध्ये मराठी संस्कृतीचे संवर्धन आणि आव्हाने | प्रा.डॉ. रामनाथ गंगाधर वाढे | 156 |
| 19 | जागतिकीकरण आणि स्त्रीवादी साहित्य | प्रा.डॉ. रामलीला सुदामराव पवार | 160 |
| 20 | जागतिकीकरण आणि भाषा | स्हा. प्रा. वाढेकर छाया किसनराव | 164 |
| 21 | जागतिकीकरण आणि मराठवाड्यातील ग्रामीण कविता. | प्रा.भारत भिमानी चव्हाण | 166 |
| 22 | जागतिकीकरण साहित्य आणि मराठी भाषा | डॉ.संदीप अ. बनसोडे | 168 |
| 23 | जागतिकीकरण आणि दलित साहित्यातील आत्मकथने | डॉ.समाधान इंगळे,<br>प्रा.शरद लक्ष्मणराव सदाफुले | 171 |
| 24 | जागतिकीकरण व ग्रामीण संस्कृती | प्रा. महानंदा संदीपान बीडकर | 175 |
| 25 | जागतिकीकरणामध्ये सूफी आणि दत्त संप्रदाय तत्त्वविचार तुलनात्मक संशोधन | प्रा. टकले जी.पी. | 179 |




Scanned with CamScanner

CURRENT GLOBAL REVIEWER
ISSN : 2319 – 8648 Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue 1, Vol 1, 10th Feb. 2018

# जागतिकीकरण आणि दलित साहित्यातील आत्मकथने

**डॉ.समाधान इंगळे**
*सहाय्यक प्राध्यापक मराठी विभाग, र.भ.अट्टल महाविद्यालय,गेवराई , ता.गेवराई जि.बीड*
**प्रा.शरद लक्ष्मणराव सदाफुले**
*संशोधक विद्यार्थी मराठी विभाग, र.भ.अट्टल महाविद्यालय,गेवराई , ता.गेवराई जि.बीड*

-----------------(23)-----------------

**प्रस्तावना :**

आजच्या घडीला जागतिकीकरणाबद्दल विचार करणे खूप गरजेचे झाले असून संपूर्ण जग हे एक वैश्विक खेडे होऊ लागले आहे. मानवतेच्या भावनेने 'वसुधैवं कुटुंबकम्' म्हणजेच हे 'विश्वचि माझे घरं'. सर्व विश्व एका कुटुंबासारखे झाले पाहिजे. ही मागणी किंवा इच्छा अगदी रास्त आहे. ती आज पूर्ण होतांना दिसून येत आहे. याची सुरुवातच १९९० च्या दशकात झाली. जागतिकीकरणाच्या परिणामाने खाजगीकरण आणि उदारीकरण या दोन संकल्पना देशात रुजण्यास प्रारंभ झाला. जागतिकीकरणाने जगातील अनेक लोकांचे जीवन खूपच प्रभावित केलेले दिसून येत आहे. आज जगातील प्रत्येक व्यक्ती हा जागतिकीकरणाच्या प्रभावाखाली आला आहे. कोणतीही व्यक्ती, समाज, संघटना, घटक, राज्य या देश जागतिकीकरणापासून अलिप्त राहू शकत नाही. 'माणूस हा समाजशील प्राणी आहे' हे आजही तंतोतंत लागू आहे. म्हणूनच आज जगाच्या कोणत्याही दुसऱ्या टोकाला घडलेली घटना काही सेकंदात, क्षणात सर्व जगभर पसरते. तिकडे दूरवर अमेरिकेत होणारी चक्रीवादळे, निवडणूका असो, जपानमध्ये होणारा प्रलयंकारी भूकंप असो या भारताला दिलेली बुलेट ट्रेन असो, दुसरीकडे इसिसने चालवलेला नंगानाच असेल, चीनने काबीज केलेली बाजारपेठ असेल, डोकलाममध्ये केलेली घुसखोरी असेल या पाकिस्तानने केलेले दहशतवादी कृत्य, सैनिकांची कापून नेलेली मुंडकी असो, काश्मिरमध्ये होणारा दहशतवाद आणि लहान मुले व तरुणांच्या हाती दिलेल्या बंदुका, सैन्यावर होणारी दगडफेक असो किंवा इकडे महाराष्ट्रात २६ नोव्हेंबर, २००९ ला मुंबईवर झालेला दहशतवादी हल्ला, देशाची राजधानी दिल्लीतील निर्भयाकांड, कोपर्डीतील बलात्कार आणि हत्याकांड, माळीण दुर्घटना, राज्यात निघालेले मराठा क्रांती मोर्चे असो अथवा अलिकडे भिमा कोरेगाव शौर्यदिनाच्या कार्यक्रमावर केलेली दगडफेक असो. पद्मावत या हिंदी सिनेमाच्या वादावरुन देशात चाललेला राडा, देशात सर्वत्र अभिव्यक्ती स्वातंत्र्याची होत असलेली गळचेपी, शेतकरी संप, ऑनलाईन कर्जमाफीचा घोळ, नोटबंदी, सर्जिकल स्ट्राईक, तथाकथित गोरक्षकांनी सुरु केलेला उच्छाद, कुंभमेळ्यावरील उधळपट्टी, तिहेरी तलाक वर केलेली बंदी, हज अनुदान बंदची घोषणा, राज्यघटना बदलण्याची सुरु असलेली धडपड आदी घटना व प्रसंग यांची बातमी प्रसारमाध्यमातून दाखविली जाते आणि त्याला लाखो, करोडो लोक पाहतात. तर तीच बातमी घटना सोशल मिडीयावर क्षणार्धात जगभर पसरते आणि त्याला लाखो, करोडो लोक पाहून प्रभावित होतात. समर्थक ते मेसेज पुढे पाठवतात. समाजात त्यामुळे सध्या खूप उलटसुलट घटना घडतांना दिसून येतात. प्रशासन मात्र हतबल होऊन केवळ बघ्याची भूमिका घेतात. प्रशासनातील काही लोक समाजात दंगल कशी निर्माण होईल याची व्यवस्था करतांना दिसून येतात. राजकीय मंडळी कधीकधी राजकीय फायद्यासाठी दोन जाती, दोन धर्म यांच्यात वाद निर्माण करुन देतात. चिथावणीखोर भाषा वापरुन आपला फायदा करुन घेतात. एवढेच नव्हे तर जगात त्याला काही सेकंदात पाठींबा आणि समर्थन म्हणून लाखो लोक रस्त्यावर उतरतात हे सर्व ने डोळ्याची पापणी मिटण्याच्या आत, क्षणार्धात घडते याला कारणीभूत जर काही असेल तर आजची झालेली ही माहितीतंत्रज्ञानातील सर्वात वेगवान अशी इंटरनेट क्रांती.

सामान्य माणसे मात्र सध्या अत्यंत सैरभैर झालेली दिसून येतात. अशावेळी केवळ सामाजिक कार्यकर्ते, देशाबद्दल व समाजाबद्दल तळमळ असलेली विचारवंत, साहित्यिक, कलावंत, आदी मंडळी मात्र त्यावर योग्य प्रतिक्रिया देतांना दिसून येतात. काही झारीतील लोक समाजात अशांतता निर्माण करण्याचा जेव्हा जेव्हा प्रयत्न करतात तेव्हा तेव्हा समाजाची काळजी असणारे सार्वजनिक मंडळीच समाजात निर्माण होणारा वाद विचाराने, चर्चेने व समाजाला एक विचार देऊन वाद मिटवून समाजात सामंजस्य निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. साहित्य हा समाजाचा आरसा असतो म्हणून समाजातील घडणाऱ्या लहान- मोठ्या घटनांचे प्रतिबिंब साहित्यातही पडत असते. हे साहित्य मग एका भाषेतून दुसऱ्या भाषेत अनुवादीत, भाषांतरीत होत जाते. जागतिकीकरणाने मराठी साहित्यावरही खूप मोठा प्रभाव टाकलेला दिसून येतो. केवळ मराठी साहित्यावरच नाही तर त्यातील सर्व प्रकारच्या साहित्यक्षेत्रावर याचा

खूप मोठा प्रभाव दिसून येतो. जागतिकीकरणाने तत्कालिन दलित साहित्य व आजचे आंबेडकरी साहित्यही प्रभावित झालेले दिसून येते. आंबेडकरी व परिवर्तनवादी साहित्यात प्रामुख्याने आत्मकथने, स्वकथे यांना नुसते मराठीचेच वाचक मिळवून दिलेत असे नाही तर मराठी भाषेच्या पलिकडे जाऊन भारतातील अनेक भाषा व जगातील अनेक भाषांमध्ये ते गेलेले दिसून येते. मराठीतील अनेक आंबेडकरी साहित्यिकांची आत्मकथने जगाच्या अनेक भाषांमधून अनुवादीत, भाषांतरीत झालेली दिसून येतात, हा जागतिकीकरणाचा खूप मोठा फायदा झाला आहे हे नाकारता येणार नाही.

**जागतिकीकरण आणि मराठी साहित्यातील आत्मकथने :**

जागतिकीकरणाने खेडे व ग्रामीण जीवन जरी उध्दवस्त झालेले असले तरी त्यांची दुःखे, वेदना यासही जागतिक पटावर ठेवण्याची संधी मिळालेली दिसून येते. प्रसिध्द साहित्यिक तथा माजी कुलगुरु डॉ.नागनाथ कोत्तापल्ले एक ठिकाणी असे म्हणतात की, 'जागतिकीकरणाबद्दल बोलणे ही काही सोपी गोष्ट नाही कारण या विषयावर इतके लिहिले गेले आहे आणि रोज इतके बोलले जाते की, त्याबद्दल नेमकी काय भूमिका घ्यावी हा प्रश्न पडतो. जागतिकीकरणाच्या बाजूने बोलणारे जसे मोठ्या संख्येने दिसून येतात तेवढ्याच प्रमाणात जागतिकीकरणाला कडाडून विरोध करणारेही आढळून येतात. जागतिकीकरणाच्या परिणामाने येत्या काही वर्षात भारत सुखी आणि समृध्द झालेला दिसेल, शेतकऱ्यांची उत्पादने जगभर जाऊन सगळीकडे आलबेल होईल, अशी स्वप्नमय चित्रे रंगवतांना काही लोक दिसतात. त्याचप्रमाणे याच्या नेमके उलट होईल असे म्हणणाऱ्यांची संख्या काही कमी नाही. अशा गदारोळातून कसा मार्ग काढावयाचा हा प्रश्न आहे. शिवाय जागतिकीकरण आणि त्याचे परिणाम समजून घ्यायचे तर अभ्यासाचा एक मोठा पट मांडावा लागतो. जागतिक पातळीवरील राजकारण आणि त्यातील दबाव गट-हे जसे समजून घ्यावे लागतात, त्याप्रमाणेच अर्थकारणातील ताणतणावही समजून घ्यावे लागतात. परिणामांचा विचार करतांना समाज, संस्कृती यांसारख्या सगळ्याच गोष्टींचा विचार करावा लागतो. असा मोठा पट एकट्यादुकट्या माणसाला मांडता येईलच असे नाही. ही एक मर्यादा नेहमीच लक्षात ठेवली पाहिजे, ती येथेही आहेच हे मी आवर्जून नोंदवू इच्छितो.'

**जागतिकीकरण आणि त्याचा प्रभाव :**

जागतिकीकरणाच्या चर्चेमध्ये आणखी दोन शब्दांचा समावेश करावा लागतो, हे दोन शब्द उदारीकरण आणि खाजगीकरण. म्हणजे क्रम लावायचा झाला तर उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण असा क्रम लावावा लागतो किंवा लावला जातो. हे कशाचे उदारीकरण आहे ? कोणत्या गोष्टी जागतिक पातळीवर आणावयाच्या आहेत? जगातील दारिद्र्यरेषेखालील लोकांना, त्यांची प्रगती व्हावी म्हणून काही उदार योजना आहेत का या ? सगळ्यांना एका समानतेच्या स्तरावर नेण्याची प्रक्रिया म्हणजे जागतिकीकरण आहे की काय ? आणि खाजगी म्हणजे कोणापासून खाजगी ? आणि हे सगळे करु पाहणारे महामानव तरी कोण आहेत ? 'जगाच्या कल्याणा, संतांच्या विभूती' असे ज्यांना म्हणावे ते कोण आहेत ? साधारणतः जागतिकीकरण हा शब्द अधिक मोठ्या प्रमाणात ऐकू येतो तो रशियन महासत्ता कोसळल्यानंतर हे लक्षात ठेवले पाहिजे. जागतिकीकरण तर काय कित्येक शतकांपासून चालूच आहे, असली भोंगळ विधाने कधी कधी केली जातात. अशी विधाने करणाऱ्यांना एकतर परिस्थितीची नीटशी जाणीव झालेली नसते किंवा मुद्दामहून ही परिस्थिती त्यांना लक्षात घ्यावयाची नसते. याचा अर्थ असा की रशियन महासत्ता विघटित होण्यापूर्वी जग स्थूलमानाने दोन प्रकारच्या अर्थव्यवस्थांमध्ये विभागलेले होते. एक भांडवलदारी अर्थव्यवस्था आणि दुसरी अर्थव्यवस्था म्हणजे साम्यवादी अर्थव्यवस्था. एका प्रकारे जगातील या दोन महासत्ता परस्परांवर धाक ठेवून होत्या. जगातील राष्ट्रे आपापल्या विचारांप्रमाणे कोठल्यातरी एका सत्तेच्या बरोबर राहण्याचा प्रयत्न करीत होती. भारतामध्ये मिश्र अर्थव्यवस्थेचा प्रयोग राबविण्याचे प्रयत्न असले तरी सरकारी उद्योग कसे हाणून पाडावेत याची कटकारस्थाने आधीपासूनच चालू होती. आज तर सरकारी उद्योग- त्यातील चांगले चाललेले उद्योगही विकण्यासाठीच एक मंत्री नेमण्यात आलेला होता. या मंत्रिपदावर अरुण शौरी हे महान गृहस्थ काम करीत होते आणि ते अतिशय तत्परतेने उद्योग विकत होते. सरकारचे काम उद्योग चालविणे, दुकान चालविणे नाही अशी भूमिका घेत घेत उत्तम चाललेले उद्योग किंवा व्यवसाय स्वस्तात देण्याचे उद्योग करण्यासाठी एक मंत्री नेमायचा ही हास्यास्पद गोष्ट असली तरी वास्तव आहे.

रशियन सत्तेच्या पतनानंतर अमेरिकाच काय जगातील भांडवलदारी राष्ट्रांना गवसणी घालायला आता आकाशच मोकळे झाले आहे. भांडवलदारी राष्ट्रे असे जरी आपण म्हणत असलो तरी त्या त्या देशातील भांडवलदार असेच म्हणावे लागते किंवा भांडवलदारांच्या माध्यमातून या राष्ट्रांना सर्व जगावर सत्ता गाजवायची आहे. हा वेगळ्या प्रकारचा साम्राज्यवादच आहे. हा साम्राज्यवाद

आणि ही भांडवलदारी अर्थव्यवस्था आता चौखूर उधळू लागली आहे. अर्थात, त्यासाठी अविकसित आणि दरिद्री देशातील दारिद्र्य कारण आहे. या सगळ्या दरिद्री देशांना स्वतःचा विकास करुन घ्यायचा असेल तर आर्थिक सहाय्य करावयास हे प्रगत देश आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक यांसारख्या संस्थांच्या माध्यमातून तयार आहेत. अर्थात, अशी मदत देतांना त्यांच्या अटी असणार हे स्वाभाविक आहे आणि भिका-यांना पर्याय नसतो, या म्हणीप्रमाणे या अटी मान्य करण्याशिवाय विकसनशील व दरिद्री देशांना दुसरा पर्यायच नाही. मग या अटी आमच्या अंतर्गत धोरणात ढवळाढवळ करणाऱ्या असू शकतात नव्हे, आहेत. उदा.कल्याणकारी योजनांच्या नावांवर जो निधी उधळला जातो तो बंद केला पाहिजे, न चालणारे सार्वजनिक उद्योग बंद केले पाहिजेत.

**दलित आत्मकथनातील वास्तव :**

दलित आत्मकथने ही दलित साहित्याची एक मोठी जमेची बाजू आहे. अंतर्मुख पातळीवरील चिंतनशीलता आणि प्रांजळ आत्मकथन हे आत्मकथनाचे महत्त्वाचे विशेष होत. डॉ.वासुदेव मुलाटे आपल्या दलितांची आत्मकथने : संकल्पना आणि स्वरुप मध्ये असे सांगतात की, 'आत्मकथनकार त्याच्या आत्मकथनातून गतकाळातील आठवणी सांगत असतो. हा गतकाळ त्याच्या आयुष्याचा एक भाग असतो. या आठवणींचे कथन हे त्याला आठवेल त्याप्रमाणे तो करीत असतो. अर्थात काही त्याला अगदी जसे घडले तसे आठवेल तर काही आठवणार नाही. आठवले तरी ते धुसर, अस्पष्ट असे असेल. उदा.'आभरान' मध्ये पार्थ पोळके त्यांच्या लहानपणाचा, त्यांच्या झोपडीत साप निघाल्याचा प्रसंग सांगतात, तो बराचसा स्मरण आणि कल्पना यातून रेखाटलेला आहे हे लक्षात घ्यावे लागते. म्हणजे एखादी आठवण किती जुनी आहे त्यावर ते अवलंबून आहे. त्यावर तिचे धुसरपण किंवा अस्पष्ट असणे अवलंबून आहे. काही आठवणी तर केवळ ऐकिव माहितीवर लिहिलेल्या असू शकतात. उदा. 'जिणं आमुचं'मध्ये बेबी कांबळे यांनी त्या वर्षा दीडवर्षांच्या असतांनाचा प्रसंग सांगितला आहे. दीड-दोन वर्षांची बेबी ही आजारपणाने मेली आहे असे समजून त्यांची आई, आजी, शेजारीपाजारी रडू लागतात व त्यांना मृत झाल्याचे समजून पुरण्याची तयारीही पूर्ण होते. पण आईच्या दुःखातील आग्रहामुळे त्यांना पुरल्या जात नाही. आणि नंतर मुलगी जीवंत असल्याचे सर्वांच्या लक्षात येते व सर्वांना आनंद होऊन अर्थातच पुढचा अनर्थ टळतो. वयाच्या एक-दीड वर्षाच्या मुलीला हा प्रसंग कळणार तरी कसा ? आणि आठवणार तरी कसा ? अर्थातच ही आठवण त्यांच्या आईने किंवा इतर वडिलधाऱ्यांनी त्यांना सांगितलेली आठवण आहे हे लक्षात घ्यावेच लागते. अशा आठवणींचे कथन करतांना तीवर कल्पनांची पुटे चढविणे साहजिक असते.

**जागतिकीकरणाने आत्मकथनांना जागतिक भाषांमध्ये मिळालेली संधी :**

आत्मकथनकारांच्या पूर्वायुष्यातील आत्मकथनाला आंबेडकरी चळवळीची प्रेरणादायक पार्श्वभूमी आहे. या पार्श्वभूमीने या लेखकांना शिक्षित केले आहे. त्यांच्या जीवनात नव्या सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. त्यांच्या प्रगतीची वाट दाखवून दिली आहे. तसेच त्यांना लिहितेही केले आहे. आत्मकथन लिहितांना या लेखक लेखिकांची वये बघितली तर असे दिसते की, अनेक लेखक हे तिशी- चाळीशीच्या आतील आहेत. 'तराळ- अंतराळ'चे लेखक शंकरराव खरात, 'माझ्या जल्माची चित्तरकथा'च्या लेखिका शांताबाई कांबळे, 'जिणं आमुचं'च्या लेखिका बेबी कांबळे, 'अक्करमाशी'चे लेखक शरणकुमार लिंबाळे, 'गबाळ'चे लेखक दादासाहेब मोरे, 'उचल्या'चे लेखक लक्ष्मण गायकवाड, 'कोल्हाट्याचं पोर'चे लेखक किशोर काळे, 'उपरा'चे लेखक लक्ष्मण माने, 'बलुतं'चे लेखक दया पवार, 'आठवणींचे पक्षी'चे लेखक प्र.ई.सोनकांबळे, 'आमचा बाप आणि आम्ही'चे लेखक नरेंद्र जाधव, 'मला उध्वस्त व्हायचंय'च्या लेखिका मलिका अमर शेख, आदी दलित आत्मकथनांनी आपले साहित्यात एक वेगळे स्थान निर्माण केलेले असून त्यातील बऱ्याच कलाकृतींना जागतिक पातळीवर ओळख निर्माण झालेली आहे. अनेक आत्मकथनांना मराठी भाषेशिवाय भारतातील इतर अनेक भाषांमध्ये व काहींना जगाच्या विविध भाषांमध्ये स्थान मिळालेले दिसून येते.

जागतिकीकरणाचा प्रभाव जसा जगावर पडलेला दिसून येतो तसाच तो प्रत्येक माणसावरही पडलेला दिसून येतो. जागतिकीकरणाचे जरी अनेक दुष्परिणाम असले तरी मराठी साहित्याला जागतिक उंचीवर नेऊन ठेवण्यात जागतिकीकरणाने जी संधी निर्माण करुन दिली त्याची ही नोंद घेणे आवश्यक आहे. आज अनेक साहित्यकृती जगाच्या अनेक भाषा, अनेक विद्यापीठांमध्ये अभ्यासासाठी ठेवण्यात आल्या असून त्यामुळे आपल्या देशातील असलेली सामाजिक, धार्मिक, राजकीय, आदी स्वरुपाची पार्श्वभूमी, देशात असलेल्या अनेक चांगल्या - वाईट घटना यांनी साहित्याच्या माध्यमातून अवघ्या जगाचे लक्ष वेधून घेतलेले दिसून येते. हीच मराठीतील दलित आत्मकथनांना जागतिकस्तरावर जाण्याची जागतिकीरणामुळे मोठी संधी मिळालेली दिसते.



Scanned with CamScanner

एकंदरीत जागतिकीकरणात जगातील अनेक भाषा, विचार, संस्कृती, कलाकृती यांची जगाच्या कानाकोपऱ्यात गेलेली दिसून येते. जागतिकीकरणाने सामाजिक, आर्थिक, भौतिक नुकसान अत्यंत कमी परंतु फायदा मोठ्या प्रमाणावर झाल्याचे दिसून येते. जागतिकीकरणाने देशातील बाराबलुतेदारांची, शेतकऱ्यांची, लहान कारागीरांची, कारखानदारांची जशी पंचाईत झाली तशीच त्यांना अधोरेखित करणाऱ्या साहित्याला, कलेला मात्र जागतिक विचारमंच मिळवून दिला. जगातील अनेक संस्कृतींचे, विचारांचे दर्शन या निमित्ताने झाल्याचे दिसून येते.

**संदर्भ :**

१. दलितांची आत्मकथने संकल्पना व स्वरूप : डॉ.वासुदेव मुलाटे, स्वरूप प्रकाशन,औरंगाबाद, जानेवारी १९९९
२. जागतिकीकरण आणि मराठी साहित्य डॉ.सौ.नलिनी महाडिक गौरव ग्रंथ : संपा.डॉ.शरद गायकवाड, स्नेहवर्धन प्रकाशन,पुणे.
३. डॉ.भालचंद्र फडके : दलित साहित्य म्हणजे काय ? दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह



Scanned with CamScanner